संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

संपादकीय

भारतीयांचे परदेशी जाण्याचे वाढते आकर्षण

एकीकडे भारत आपल्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतो आहे. तर दुसरीकडे भारत सोडून इतर देशांमध्ये स्थायिक होणाऱ्या भारतीयांची संख्याही वाढते आहे. गेल्या दोन वर्षात जवळपास पंधरा लाख भारतीयांनी इतर देशामध्ये स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. त्यासोबतच जगात विविध ठिकाणी असलेल्या भारतीय तरूणांनी आपल्या देशात यावे आणि स्वतः चे उद्योग सुरु करावेत म्हणून सरकारतर्फे आवाहन केले जाते. त्यासाठी काही विशेष योजनाही सरकारने जाहीर केलेले आहे. ज्यामध्ये जागा, कर्जपुरवठा, यासाठीच्या काही सवलती देऊ केल्या आहेत. स्टार्टअप इंडिया किंवा मेक इन इंडिया यासारखे प्रकल्प राबवून भारतीय तरूणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न होतो. तरीदेखील शिक्षणाच्या निमित्ताने इतर देशांमध्ये गेलेल्या तरूणांपैकी पन्नास टक्के तरुण पुन्हा भारतात येत नाहीत. तिकडेच नोकरीच्या निमित्ताने स्थायिक होत जातात. ही संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने त्याबद्दल विचार करण्याची वेळ आलेली आहे. भारत हा लोकसंख्येच्याद्दष्टीने सर्वात मोठा देश आहे. इथले तरूण शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने मोठ्यासंख्येने परदेशात जातात. कारण त्यांच्या बुध्दीमत्तेचा आणि गुणवत्तेचा तिथे गौरव होतो.भारतात घेतलेले शिक्षण असूनहीत्यांच्या या बुध्दीमत्तेचे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स जपान यासारख्या देशांमध्ये कौतुक होते. म्हणजेच त्यांनाखऱ्या अर्थाने स्वतःमधल्या कर्तृत्वाला वाव देता येतो. भारतात ही संधी उपलब्ध होत नाही. आणि उपलब्ध झाली तरी त्यातून अपेक्षित समाधान मिळू शकत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. गेल्या काही वर्षापासून सुरू असलेली ही बुध्दीमत्तेची निर्यात अजूनही थांबलेली नाही. निदान भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त परदेशात जाणारा हा ब्रेन ड्रेन थांबवण्याचा अधिक प्रयत्न झाला पाहिजे. यातला दखल घेण्यासारखा भाग असा आहे की, इतक्या मोठ्या संख्येने भारतीय इतरत्र स्थायिक होतात आणि तरूणही मोठ्या संख्येने परदेशात जातात. याचा एकत्रित विचार करून सरकारने धोरणच आखलेले नाही. या सगळ्या मनुष्यशक्तीचा सकारात्मक उपयोग करून घेता येऊ शकतो. त्यासाठी स्वतंत्र धोरणच जाहीर करण्याची आवश्यकता आहे, स्टार्टअप किंवा मेक इन इंडिया अशा वेगवेगळ्या योजनांमधून हा ब्रेन ड्रेन थांबण्याची शक्यता दिसत नाही.

आपण आपल्या भारतीयत्वाचा वेगवेगळ्या पध्दतीने अभिमान बाळगत असतो. परदेशामध्ये जे भारतीय उत्तम कामगिरी करून दाखवतात त्यांच्याबद्दलही आपल्याला खूप आदर वाटत असतो. जगातील काही प्रमुख देशांच्या प्रगतीमध्ये आता भारताचेही नाव येऊ लागले आहे. भारताची आर्थिक प्रगती हळुहळू वाढत असल्याचे सांगितले जाते. परंतु प्रगतीचे किंवा विकासाचे सगळे मापदंड एका बाजूला तर इतर मोठ्या देशांच्या प्रगतीत भारतीयांचे असलेले योगदान दुसऱ्या बाजुला असा एक मोठा फरक लक्षात घ्यावा लागतो. म्हणजे भारतातून बाहेर गेलेली मंडळी तिथल्या देशाच्या विकासात मोठा हातभार लावतात. नवी नवी संशोधने करतात.पण मग भारतातच यातरूणांना ही संधी का मिळू शकत नाही. निदान काही प्रमाणात तरी त्यांच्या या बुध्दीमत्तेचा योग्य तो सन्मान करता आला पाहिजे. आज अमेरिकेतल्या सिलिकॉन व्हॅली किंवा नासासारख्या संस्थांमध्ये तीस ते पस्तीस टक्के भारतीयांची संख्या आहे. त्यांनी दाखवलेल्या कर्तृत्वाची तातडीने तिथे दखल घेतली जाते. आणित्यांच्या बुध्दीमत्तेचा किंवा संशोधनाचा योग्य तो गौरवही होत असतो. म्हणजे नुकत्याच देशातल्या आयआयटीजमधून अनेक बुध्दीमान तरूणांची निवड केली गेली. चांगल्या मोठ्या पगाराचे पॅकेज देऊन अनेक परदेशी कंपन्यांनी त्यातरूणांना स्वतः कडे आकर्षित केलेले आहे. विशेष म्हणजे दरवर्षी आयआयटीमधून परदेशी कंपन्यांनी भारतीय तरूणांची निवड करण्यात आघाडीच घेतलेली पाहायला मिळते. म्हणजेच ही संख्या दरवर्षी वाढते आहे. परंतु याच आयआयटी मधल्या तरूणांना ते शिकत असतानाच वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देण्याचे ठोस प्रयत्न होताना दिसत नाहीत. कारण आतापर्यंत अशी एकही घटनाघडलेली नाही की भारत सरकारने दिलेल्या संधीमुळे परदेशी कंपन्यांची ऑफर नाकारली गेली आहे. यावरून भारतीय तरूणांची निराशा होते. त्यांच्या अभ्यासाचे मूल्य लक्षात घेतले जात नाही. बऱ्याच वेळेला भारतीय तरूणांचे परदेशी कंपन्यांकडून जे कौतुक होते त्यावेळी त्यांचे परिश्रम आणि जिद्द या गोष्टीचेच परदेशी लोक कौतुक करतात. मग ते कौतुक भारतात का होऊ नये असा साधा प्रश्न निर्माण होतो.

सकारात्मक विचार हवा

ज्या देशामध्ये तरुणांची सर्वाधिक लोकसंख्या आहे. इतर अनेक बाबतीत सरकार विशेष धोरणजाहीर करत असते. परंतु भारतीय तरूणांच्या बुध्दीमत्तेबाबत सरकारकडे धोरणच नाही असे म्हणण्याची वेळ येते. आतापर्यंत या ब्रेनड्रेनविषयी विशेष चर्चा होत होती.आता भारत सोडून इतर देशांमध्ये नागरीकत्व स्वीकारण्याची लाट आलेली आहे. याचादेखील गांभिर्याने विचार व्हायला हवा. कारण यामध्ये व्यावसायिक कारणांसाठी स्थलांतरीत होणाऱ्यांची संख्या जास्त असल्याचे सांगितले जाते. व्यवसाय उद्योगाचा विस्तार आणि त्यासाठी योग्य ती सरकारी धोरणे आवश्यक असतात. परंतु आपल्याकडे कोणताही उद्योग व्यवसाय करायचा असेल तर पहिल्यांदाच भ्रष्टाचाराशी सामना करावा लागतो. राजकीय आणि नोकरशाहीमध्ये सातत्याने अडवणुकीचा प्रयत्न होत असतो. सरकारी दप्तरदीरंगाई हे तर उद्योग व्यावसायिकांसाठी एक मोठे आव्हान असते. अनेक व्यावसायिक या गोष्टीला कंटाळूनच भारत सोडतात आणि इतर देशांमध्ये अल्पावधीत स्वतःचा विकास करून घेतात. जिथे पिकते तिथे विकत नाही अशी जी मराठीत म्हण आहे ती याबाबतीतही जशास तशी लागू पडते.म्हणूनच देशाचा अमृतमहोत्सव साजरा करताना स्वतंत्र भारतातील आणि सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशातील लोकांनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करण्याचा प्रकार दुर्दैवीच म्हणावा लागतो. निदान या वर्षाचे निमित्त साधून एक सर्वंकष धोरण तयार झाले पाहिजे. आणि ते राज्या राज्यांकडून राबवून घेतले पाहिजे. तरच आपण आपल्या देशातील मनुष्यशक्तीचा सकारात्मक विचार करीत आहोत असे म्हणतायेऊ शकते.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

सुंदर क्षणांची वाट पाहण्यापेक्षा
लाभलेला क्षण सुंदर करा...

पंचांग

मंगळवार ४ जानेवारी, २०२२
शक १९४३ प्लवनामसंवत्सर
*** पौष शुक्ल द्वितीया * नक्षत्र - उत्तराषाढा**

रवी उदय- ०७-१४,
रवी अस्त- १८-१३



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मकर

चंद्रदर्शन

कविता...

विमान...!

गर गर फिरे विमान
बघ हे गर गर फिरे विमान ।। ध्रु.।।
हलवुनि पंखा उडत नभी हें
पक्षिच जणूं महान ।। १।।

नाद जयाचा घुमतां कानी
बघती सारे येई कुठुनी
उचलुनि वरती मान ।। २ ।।

अफाट सागर तो न जुमानी
गिरिवर उंचही लहान मानी
पुरे न ज्या अरस्मान ।। ३ ।।

असे जयाची उंच भरारी
घालित साऱ्या जगात फेरी
वेगही वायुसमान ।। ४ ।।

● ना. द. तांबे ●

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
कार्यकारी संपादक : रोहित पांडे
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

दुसऱ्या कसोटीत भारताला २०२ धावांत गुंडाळले

भारत-दक्षिण आफ्रिका संघातील आजपासून सुरू झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी कर्णधार विराटच्या गैरहजेरीत खेळणाऱ्या भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजांनी सुरेख मारा करत अवघ्या २०२ धावांतच गुंडाळले. कर्णधार राहुल ५० आणि अश्विन ४६ धावा यांच्या चिवट फलंदाजीमुळे भारताला २०० धावांचा टप्पा पार करता आला.

■ जोहान्सबर्ग

कर्णधार विराटच्या गैरहजेरीत नेतृत्वाची धुरा राहुलकडे सोपविण्यात आली. राहुलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. परंतु नाणेफेक जिंकल्याचा फारसा फायदा भारतीय फलंदाजांना घेता आला नाही. ६३.१ षटकांत चहापानानंतर भारताचा पहिला डाव २०२ धावांतच आटोपला. आफ्रिकन वेगवान गोलंदाज जेन्सनने अवघ्या ३१ धावांत ४ बळी घेऊन भारताची दाणादाण उडविली. तर रबाडा, ओलिव्हरने प्रत्येकी तीन बळी घेऊन जेन्सनला चांगली साथ दिली. मयांक-राहुलने भारताला ३६ धावांची सलामी करून दिली. परंतु मयांक बाद झाल्यानंतर भारताची घसरगुंडी सुरू झाली. पुजारा ३, रहाणे ०, विहारी २० हे ९१ धावा असतानाच माघारी परतले.

कर्णधार राहुलने कसानाची खेळी करताना १३३ चेंडूंत ९ चौकार मारून ५० धावा फटकावल्या. त्याने आपले कसोटीतील १३ वे अर्धशतक काढले. अर्धशतक झाल्यानंतर मात्र राहुल फारकाळ टिकला नाही. जेन्सननेच त्याल रबाडामार्फत झेलबाद करून भारताला मोठा धक्का दिला. ७ व्या क्रमांकावर आलेल्या अश्विनने ४६ धावांची चिवट खेळी केली. त्याने ५० चेंडू खेळताना ६ चौकार मारले. रहाणेला आपल्या कसोटी कारकीर्दित प्रथमच पहिल्या चेंडूवर भोपळा न फोडता बाद व्हावे लागले. आफ्रिकन गोलंदाजांनी 'शॉर्टपिच' चेंडूंचा सुरेख वापर करून भारतीय फलंदाजांना आपल्या जाळ्यात अडकवले. त्यातच विराट नसल्यामुळे भारतीय फलंदाजांवर काहीसे दडपण आले. दिवसअखेर आफ्रिकेने सलामीवीर मार्क्रमचा बळी गमावून १ बाद ३५ धावांची चांगली मजल मारली.

पाकिस्तानचा माजी कर्णधार हाफिजची आंतरराष्ट्रीय सामन्यातून निवृत्ती

■ कराची

पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि बुजुर्ग अष्टपैलू खेळाडू मोहम्मद हाफीजने आंतरराष्ट्रीय सामन्यातून आपली निवृत्ती जाहीर केली. स्थानिक आणि टी-२० सामन्यात मात्र तो आणखी काही काळ खेळणार आहे.

५५ कसोटी, ३६५२ धावा, ५३ बळी
२८१ वनडे, ६६१४ धावा, १३९ बळी
६९ टी-२० सामने, २५१४ धावा ६१ बळी

पाकिस्तानतर्फे तब्बल ३९२ आंतरराष्ट्रीय सामन्यात हाफीज खेळला त्याने १२ हजारपेक्षा जास्त धावा करताना २५० पेक्षा जास्त बळीदेखील घेतले. नुकत्याच झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध तो शेवटचा टी-२० सामना खेळला. ३ वनडे आणि ६ टी-२० विश्वचषक स्पर्धेत त्याने पाकिस्तानचे प्रतिनिधीत्व केले.

२००३ मध्ये झिम्बॉब्वेविरुद्ध त्याने वनडे सामन्यात पदार्पण केले होते. तब्बल १८ वर्षापेक्षा जास्त काळ तो पाकिस्तानतर्फे विविध आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळला. त्याच्या निवृत्तीमुळे पाकिस्तानी संघाची मोठी हानी झाली असल्याचे मत काही आजीमाजी खेळाडूंनी व्यक्त केले.

बंगाल रणजी संघात कोरोनाचा शिरकाव

कोलकाता- बंगाल रणजी क्रिकेट संघात कोरोनाचा शिरकाव झाला असून त्यांच्या तब्बल ६ खेळाडूंना आणि सहाय्यक प्रशिक्षकाला कोरोनाची लागण झाली आहे. १३ जानेवारीपासून रणजी करंडक सामन्याला सुरुवात होत आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून बंगाल संघातील सर्व खेळाडूंची आरटीपीसीआर चाचणी करण्यात आली. त्यात ६ खेळाडूंचा आणि सहाय्यक प्रशिक्षकाचा अहवाल पॉझिटिव्ह आल्याचे बंगाल क्रिकेट संघटनेचे सचिव स्नेहाशिष गांगुली यांनी सांगितले. त्यामध्ये सुदिप चॅटर्जी, मुजुमदार, शैफी, प्रामाणिक, यादव, दुरी हे खेळाडू असून लाहीरी हे सहाय्यक प्रशिक्षक आहेत. कोरोनाची लागण खेळाडूंना झाल्यामुळे मुंबईविरुद्ध होणारा बंगाल संघाचा सराव सामना रद्द करण्यात आला. रणजी करंडक स्पर्धेत बंगालचा ब गटांत समावेश आहे.

युवा, माऊली संघ उपांत्यफेरीत

■ भिवंडी

ठाणे जिल्हा कबड्डी संघटनेच्या सहकार्याने उजाळा क्रीडा मंडळाने वळगाव येथील पाटील क्रीडानगरीत आयोजित केलेल्या ठाणे जिल्हा निवड चाचणी कब्बडी अजिंक्यपद स्पर्धेत कुमारी गटात- रा.फ.नाईक, राजश्री शाहू, ज्ञानशक्ती युवा आणि किल्ले माऊली संघांनी उपांत्यफेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात रा.फ.नाईक संघाने स्फूर्ती मंडळाचा ४३-२५ गुणांनी आरामात पराभव केला. अनुजा गोळे, निकिता शिर्के यांच्या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. दुसऱ्या सामन्यात राजश्री शाहू अ संघाने संकल्पचा ४५-२२ गुणांनी सहज पराभव केला.

तो ज्योति विश्वकर्मा, सिमरन सोनार या दोघींच्या शानदार खेळाच्या जोरावर इतर सामन्यात ज्ञानशक्तीने शाहू ब संघाचा आणि किल्ले माऊलीने श्रीसमर्थचा पराभव केला. विजयी संघातर्फे सायना गायकवाड, मानसी गायकर, मानसी बांगर, विद्या जगदाळे चमकल्या.

रोहित भोईर अजिंक्य

■ मुंबई

शिवनेर-आयडियल स्पोर्ट्स ॲकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या शालेय मुला-मुलींच्या १६ वर्षाखालील विनाशुल्क बुद्धिबळ स्पर्धेत श्रीहसू अडवाणी मेमोरियल स्कुल गोवंडीच्या रोहित भोईरने विजेतेपद पटकावले. त्याने चेंबूर गोवंडी विभाग विजेत्या आर्या गोरडेचा २८ चालींमध्ये पराभव केला. तिसऱ्या क्रमांकाच्या लढतीत डिसोझा हायस्कूलच्या विवेक देवकरने प्रज्वल घोडकेला पराभूत केले.

अंतिम टप्प्यातील खेळाडूंना प्रशिक्षक नेव्हिल अल्वारीस यांनी मार्गदर्शन केले. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुढील आठवड्यात विजेत्या खेळाडूंसाठी होणारे मोफत प्रशिक्षण आणि सराव शिबिर रद्द करण्यात आले आहे. विजेत्या रोहितचे संघटन प्रमुख नरेंद्र वाबळे, गोविंदाराव मोहिते यांनी खास अभिनंदन केले.

कराटे स्पर्धेत सम्यकला २ पदके

मुंबई - सांगली येथील तरुण भारत स्टेडियममध्ये झालेल्या प्रो-कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत सम्यक गोठणकारने चांगली कामगिरी करताना १ सुवर्ण आणि १ रौप्य पदकाची कमाई केली. कांनींनजुकू चॅम्पियन्स कराटे अकॅडमीतर्फे ही स्पर्धा घेण्यात आली होती. ७०० पेक्षा जास्त खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते. सम्यकने कुमिते आणि काता प्रकारात सुवर्ण, रौप्य पदकाची कमाई केली. राजू मोरे यांचे मार्गदर्शन त्याला मिळाले.

पाचगणीत कबड्डी स्पर्धा

पाचगणी - व्यायाम मंडळातर्फे उद्यापासून राज्यस्तरीय पुरुष व्यवसायिक आणि महिला स्थानिक गटाच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
सीआयएन: U45400MH2007PTC234297
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. १९.०१.२०२२ रोजी दु. ०२.०० ते सायं. ०४.०० वाजेपर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २७.१२.२०१९ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाटीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेत:

मालमत्ता	राखीव किंमत (रु.मध्ये)	ईएमडी रक्कम (रु.मध्ये) व तिच्या सादरीकरणाची वेळ	बोलीची विस्तार रक्कम (रु.मध्ये)
गाव - गैजी, पटवार, क्षेत्र - दादू, तहसील - मौजमाबाद, जिल्हा - जयपूर, अजमेर रोड, राजस्थान - ३०३ ००९ ("लिलाव ठिकाण") येथे स्थित कॉर्पोरेट ऋणकोची कृषिक जमीन. मालमत्तेशी संबंधित अधिक तपशील आणि लिलावाच्या अटी आणि शर्तींकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट https://ksspetron.in/liquidation.html येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा.	३,२१,९५,३५६/-	रु. ३२,१९,५३५/- दि. ०४.०१.२०२२ ते दि. १४.०१.२०२२	रु. १,००,००० किंवा त्यापेक्षा जास्त

टीपा:
१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** करण्यात येईल.
२) लिलावाच्या ठिकाणी असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)च्या मालमत्तांचा ई-लिलाव करण्याच्या उद्देशाने सदर जाहीर सूचना पारित करण्यात येत आहे. कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट म्हणजेच http://ksspetron.in/liquidation.html येथे उपलब्ध प्रक्रिया कागदपत्रांचा संदर्भ घ्यावा.
३) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, श्री. विनोद सिंग यांना +९१ ९७८३४४४४७६ किंवा श्री. दिविश अहुजा यांना +९१ ८८६०५८८२०९ येथे संपर्क साधावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दूरध्वनी: ०११-४९१२१६४४-४५
दिनांक: ०४.०१.२०२२
ठिकाण: नवी दिल्ली

ई-लिलाव विक्री सूचना
(प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड (परिसमापनामध्ये) ची
गोईंग कन्सर्न म्हणून नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये विक्री)

मान. निर्णय अधिकारी, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ - I (एनसीएलटी)द्वारे दि. ८ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकाद्वारे भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ए (**"परिसमापन विनियमन"**) अन्वये गोईंग कन्सर्न म्हणून **प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड** (परिसमापनामध्ये) (**"कॉर्पोरेट ऋणको"**) किंवा त्यांच्या व्यवसायाची **विक्री**. नंतर उघड केल्या जाणाऱ्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे परिसमापकांमार्फत विक्री आयोजित करण्यात येईल. ई-लिलाव दि. १० फेब्रुवारी, २०२२ रोजी स. ११.०० पासून दु. ०२.०० भा.प्र.वे. वाजेपर्यंत पात्र बोलीदारांकरिता पोर्टलवर सुरू असेल.

कॉर्पोरेट ऋणको किंवा त्यांच्या व्यवसायाची गोईंग कन्सर्न म्हणून विक्री	राखीव किंमत#	ईएमडी रक्कम	परतावायोग्य शूल्क	किमान विस्तारयोग्य बोली
१. त्याग केलेली मालमत्ता	₹ १५० कोटी	₹ १५ कोटी	₹ ७.५ लाख	₹ १० लाख
२. त्याग न केलेली मालमत्ता *	₹ ९० कोटी	₹ ९ कोटी	₹ ७.५ लाख	₹ १० लाख

कॉर्पोरेट ऋणको किंवा त्यांच्या व्यवसायाच्या गोईंग कन्सर्न म्हणून विक्रीकरिता ई-लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता पात्रता निकष कॉर्पोरेट ऋणकोच्या वेबसाईट https://www.pratibhagroup.com/pages/liquidation.html मध्ये देण्यात आले आहेत.

* तपशीलवार प्रक्रिया कागदपत्रे पात्र बोलीदारांसह सामायिक केली जातील, ज्यामध्ये त्याग न केलेल्या मालमत्तांचे तपशील आणि वर्णन प्राप्त होईल. त्याग न केलेल्या मालमत्तेचा केवळ किमतीच्या शोधासाठी समावेश केला गेला आहे आणि विक्रीची पुष्टी करण्यापूर्वी आयबीसीच्या कलम ५२ अंतर्गत संबंधित सुरक्षित आर्थिक कर्जदारांच्या संमती आणि प्रतिभूती हितसंबंधाचा त्याग करण्याच्या अधीन राहून त्यांची विक्री केली जाईल.

\# नमूद केलेल्या राखीव किंमती या एकत्रितरित्या अनुक्रमे सर्व त्याग केलेल्या मालमत्ता आणि सर्व त्याग न केलेल्या मालमत्तांकरिता राखीव किंमती आहेत.

ई-लिलावाच्या इतर अटी व शर्ती पात्र बोलीदारांसह सामायिक केल्या जातील:
१. ई-लिलाव "जसे आहे जेथे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" तत्त्वावर मान्यताप्राप्त सेवा प्रदाता, जो नंतर कळविण्यात येईल, द्वारे आयोजित करण्यात येईल. नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ (यापश्चात, "आयबीसी")च्या कलम २९ए अन्वये समाविष्ट पात्रतेकरिता संबंधित कागदपत्रे, उद्घोषणा आणि ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती वेबसाईट https://www.pratibhagroup.com/pages/liquidation.html वर उपलब्ध आहेत. संपर्क: +९१ २२ ६६४१ ४४००, ईमेल आयडी: liquidator.pratibha@gmail.com.
२. इच्छुक सहभागींनी वेबसाइट https://www.pratibhagroup.com/pages/liquidation.html वर उपलब्ध दस्तऐवजात तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार परतावायोग्य सहभाग शूल्क जमा करणे आवश्यक आहे. संपर्क: +९१ २२ ६६४१ ४४००, ईमेल आयडी: liquidator.pratibha@gmail.com.
३. प्रक्रिया कागदपत्रे, जी पात्र बोलीदारांना नंतर पारित करण्यात येतील, त्यामध्ये तपशील असल्यानुसार परतावायोग्य इसारा रक्कम अनामत ("ईएमडी") पात्र बोलीदारांनी नंतर जमा करणे आवश्यक आहे.
४. विक्री आयबीसीच्या तरतुदी आणि त्याअंतर्गत बनलेल्या विनियमांच्या अधीन असेल.
५. अ) सहभाग शूल्कासह विनंती अर्जाचे सादरीकरण : १० जानेवारी, २०२२
ब) पात्र सहभागींची उद्घोषणा : १३ जानेवारी, २०२२
क) योग्य डिलिजन्सकरिता अंतिम दिनांक (व्हीडीआर ॲक्सेस) : २८ जानेवारी, २०२२
ड) ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०२२
इ) लिलावाचा दिनांक : १० फेब्रुवारी, २०२२ (स. ११.०० - दु २.०० भा.प्र.वे.)

\# अंतिम विक्री मोबदला देण्याची कालमर्यादा परिसमापकाच्या विवेकबुद्धीनुसार, लागू कायदे आणि नियमांनुसार अनुज्ञेय मर्यादेपर्यंत वाढविली जाऊ शकते. जर सहभागी पात्र असल्याचे न आढळल्यास, परिसमापक सदर सहभागीला सहभाग शूल्क परत करेल.
याबाबतची पुढील सर्व अद्यतने आणि बदल प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेडच्या वेबसाइट पृष्ठ https://www.pratibhagroup.com/pages/liquidation.html वर सूचित करण्यात येतील.

सही/-
अनिल मेहता
परिसमापक, प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड
पत्ता: १६०७/१६०८, १६ वा मजला, सायबर वन, ओडिशा भवनच्या मागे, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३
ईमेल आयडी: liquidator.pratibha@gmail.com
नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P00749/2017-2018/11282
ईमेल आयडी: liquidator.pratibha@gmail.com
श्री अनिल मेहता यांना भारतीय दिवाळखोरी आणि दिवाळखोरी मंडळाने इतर गोष्टींसोबत परिसमापक म्हणून काम करण्यासाठी नोंदणीचे प्रमाणपत्र दिले आहे. प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवहार, व्यवसाय आणि मालमत्तेचे व्यवस्थापन परिसमापक अनिल मेहता यांच्याद्वारे केले जाते, जे केवळ प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेडचे एजंट म्हणून आणि वैयक्तिक दायित्वाशिवाय काम करतात.
ठिकाण: मुंबई
तारीख: ०४ जानेवारी २०२२